**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर तात्पुरत्या व्हिजावर राहणाऱ्या १७ पाकिस्तानी नागरिकांना मुंबई पोलिसांनी परत पाठवलं
- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या वार्तांकनसंदर्भात भारत सरकारने १६ पाकिस्तानी यूट्यूब वाहिन्यांवर घातली बंदी
- राफेल मरीन प्रकारच्या २६ लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी आज भारताचा फ्रान्सबरोबर संरक्षण करार
- राज्यात हजारपेक्षा जास्त सेवा लोकसेवा कायद्यांतर्गत अधिसूचित करण्यात आल्या असून त्यातल्या बहुतेक सेवा ऑनलाईन उपलब्ध होतील अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही.

**आणि**

- भंडारा- नागपूर रस्त्यावर गाडीला ट्रकची धडक बसून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर तात्पुरत्या व्हिजावर राहणाऱ्या १७ पाकिस्तानी नागरिकांना मुंबई पोलिसांनी परत पाठवलं आहे. हे सर्वजण पर्यटक आणि वैद्यकीय व्हिजावर आले होते. यापैकी ज्यांच्यावर उपचार सुरू आहेत, त्यांना परतण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी २९ एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयानेही त्या भागात तात्पुरत्या व्हिजावर राहात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांवर नजर ठेवायचे निर्देश स्थानिक अधिकाऱ्यांना दिले आहेत. असे १७ पाकिस्तानी नागरिक उल्हासनगर भागात राहात असून

त्यांना परत जाण्यासाठी दिलेली मुदत आज संपणार आहे. नवी मुंबई पोलिसांनी २०० पाकिस्तानी नागरिकांच्या कागदपत्रांची छाननी सुरू केली असून तात्पुरत्या व्हिजावर आलेल्या तिघांना परत पाठवलं आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार नवी मुंबईत २२९ पाकिस्तानी नागरिक दीर्घकालीन व्हिजावर राहात आहेत किंवा व्हिजा मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने १६ पाकिस्तानी यू ट्यूब वाहिन्यांवर बंदी घातली आहे. डॉन न्यूज, एरी न्यूज, आणि जिओ न्यूज या वाहिन्यांचा त्यात समावेश आहे. भारत, भारतीय सैन्य आणि सुरक्षा यंत्रणांबद्दल प्रक्षोभक, खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली. या वाहिन्यांचे एकूण सहा कोटीहून अधिक नोंदणीकृत प्रेक्षक आहेत. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत बीबीसीच्या वार्तांकनावरही सरकारने आक्षेप घेतला आहे. बीबीसीच्या बातम्यांमधे पहलगामच्या हल्लेखोरांचा उल्लेख टेररिस्ट अर्थात दहशतवादी असा न करता मिलिटन्ट्स म्हणजे सशस्त्र क्रांतिकारक असा करण्यात आला होता. तो बदलून या दहशतवाद्यांना दहशतवादी असं संबोधलं जावं, अशा आशयाचं पत्र केंद्र सरकारने बीबीसीच्या प्रमुखांना पाठवलं आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत त्यांच्यामध्ये सुमारे ४० मिनिटं चर्चा झाली.

<><><><><>

केंद्र सरकार राफेल मरीन प्रकारच्या २६ लढाऊ विमानांची खरेदी करणार असून त्यासाठी आज फ्रान्सबरोबर संरक्षण करार होणार आहे. संरक्षण मंत्रालयाचे

अधिकारी आणि भारतातले फ्रेंच राजदूत यांच्या उपस्थितीत संरक्षण करारावर स्वाक्षऱ्या होतील. भारताचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह हे भारताचं प्रतिनिधित्व करतील. या २६ विमानांपैकी २२ सिंगल सीटर प्रकारची तर ४ डबल सीटर प्रकाराची विमानं आहेत. भारतीय नौदलाच्या गरजेनुसार या विमानांची रचना असेल. ही विमानं भारतीय नौदलाच्या विक्रांत आणि विक्रमादित्य या युद्धनौकांवर तैनात केली जातील.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू काश्मीर विधानसभेचं विशेष अधिवेशन आज भरलं आहे. कामकाज सुरु करण्यापूर्वी सभागृहाने या हल्ल्यात मरण पावलेल्यांना दोन मिनिटं मौन पाळून आदरांजली वाहिली. अध्यक्ष अब्दुल रहीम राथर यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी निषेधाचा ठराव मांडला असून त्यावर चर्चा सुरु आहे. या भयानक हल्ल्यामुळे आपण व्यथित असून मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांची माफी मागत असल्याचं मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांनी चर्चेदरम्यान सांगितलं. काश्मीरमधे आलेल्या पर्यटकांना सुरक्षित माघारी पाठवण्याची जबाबदारी आपली होती असं ते म्हणाले.

**<><><><>**

दहशतवाद्यांना जात धर्म नसतो असं म्हणत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार दहशतवाद्यांना संरक्षण द्यायचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. वडेट्टीवार यांचं वक्तव्य बेजबाबदारपणाचं आहे, असंही बावनकुळे म्हणाले. पहलगाम इथं हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा हेतू देशातल्या नागरिकांमधे फूट पाडणं असल्याचं विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हटलं आहे. भारताच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी देशविघातक प्रवृत्तींना मोडून काढणं आवश्यक

आहे, असंही वडेट्टीवार म्हणाले. वडेट्टीवार यांच्या या वक्तव्यावर बावनकुळे यांनी टीका केली आहे.

<><><><><>

लोकशाही व्यवस्थेत सरकारने जर संविधानाने दिलेले अधिकार मानले नाहीत, तर त्याविरोधात दाद मागण्यासाठी लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अस्तित्वात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यात हजारपेक्षा जास्त सेवा या कायद्यांतर्गत अधिसूचित केल्या असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. यातल्या बहुतेक सेवा या ऑनलाईन तत्वावरही राबवल्या जाणार आहेत. या संदर्भात मेटाशी संपर्क साधून गव्हर्नन्स व्हॉटसॲपवर उपलब्ध करून देण्यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचं फडनवीस म्हणाले.

सामान्य प्रशासन विभाग आणि महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री अतिथीगृह इथं हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,  कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्यासह प्रशासनातले वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

देशाची मत्स्योत्पादन निर्यात दुप्पट करायचं ध्येय सरकारने ठेवलं असून त्यासाठी मत्स्य उत्पादनात मूल्यवर्धन करणं आणि पायाभूत सुविधा बळकट करणं अतिशय गरजेचं असल्याचं मत केंद्रीय मत्स्यव्यवसाय आणि पशुपालन मंत्री राजीव रंजन सिंह यांनी आज मांडलं. सध्या ही निर्यात ६० हजार ५२४ कोटी रुपये इतकी

आहे. मात्र, सध्या सुरू असलेल्या टेरिफ युद्धामुळे भारतासाठी अनेक देशांमध्ये निर्यातीची संधी उपलब्ध झाली असून ही निर्यात दुप्पट करणं सहज शक्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. कोस्टल स्टेट्स मीट २०२५ या कार्यक्रमाचं उद्घाटन केल्यानंतर ते मुंबईत बोलत होते. मत्स्योत्पादनात सध्या भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर असून वर्ष २०२३-२४मध्ये देशाचं मत्स्योत्पादन जागतिक उत्पादनाच्या ८ टक्के, १८४ लाख टनांपेक्षाही जास्त असल्याची माहिती त्यांनी दिली. भारताला ११ हजार किलोमीटरपेक्षा जास्त किनारपट्टी असून २० लाख चौरस किलोमीटरपेक्षा जास्त एक्सक्लूजिव्ह इकॉनॉमिक झोन आहे.

किनारपट्टीवरची राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी या संसाधनांचा योग्य वापर करून घेतल्यास फक्त देशाच्या अर्थव्यवस्थेतच नाही, तर मच्छिमारांच्या जीवनातही भरीव योगदान ते देऊ शकतात, असं प्रतिपादन त्यांनी केलं. मत्स्यव्यवसाय आणि पशुपालन राज्यमंत्री एस. पी. सिंह बाघेल आणि जॉर्ज कुरियन, विविध राज्यांचे मत्स्यव्यवसाय मंत्री आणि इतर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

भोपाळच्या कुनो राष्ट्रीय अभयारण्यात काल चित्त्याच्या पाच बछड्यांचा जन्म झाल्यामुळे मध्य प्रदेशातल्या एकूण चित्त्यांची संख्या आता ३१ झाली आहे. मुख्यमंत्री मोहन यादव यांनी समाजमाध्यमांवर ही माहिती प्रसारित केली आहे. दक्षिण आफ्रिकेतून २०२२ साली मध्य प्रदेशात आणलेल्या नीरवा नावाच्या  चित्ता मादीने काल दुसऱ्यांदा बछड्यांना जन्म दिला आहे. प्रधानमंत्री मोदींच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या चित्ता प्रकल्पाचे हे मोठं यश असल्याचं यादव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं असून कुनो राष्ट्रीय अभयारण्याच्या सर्व कर्मचाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं आहे. केंदीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनीही समाजमाध्यमांवर ही बातमी प्रसारित केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी सरकारनं १३९ जणांना पद्म पुरस्कार जाहीर केले होते. त्यामध्ये ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पद्मश्री सन्मानप्राप्त मान्यवरांमधे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, चित्रकार वासुदेव कामत, सुलेखनकार अच्युत पालव, शास्त्रीय गायिकी अश्विनी भिडे- देशपांडे यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज जयपूर इथे राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे. सवाई मानसिंग मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

भंडारा- नागपूर रस्त्यावर गाडीला ट्रकची धडक बसून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर रीत्या जखमी झाला आहे. अपघातग्रस्त झालेली बोलेरो गाडी भंडाऱ्याहून नागपूरच्या दिशेने जात होती. वाटेत बेला इथे गाडी ओव्हरटेक कर असताना समोरून येणाऱ्या ट्रकची धडक बसल्याने हा अपघात झाला. या अपघातानंतर काही काळ महामार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली होती. जखमी प्रवाशाला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**